आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्या ७ वाजता

१ ऑक्टोबर २०२३ – रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला भरभरुन प्रतिसाद देत सर्वत्र स्वच्छतेसाठी एक दिवस - एक तास अभियान यशस्वी

- राज्यात ४११ स्थानिक स्वराज्य संस्थांमधे १६ लाख ४ हजार ९९५ नागरिकांचा सहभाग

- गड किल्ल्यांसाठी जिल्हा योजनेतून दरवर्षी तीन टक्के निधी उपलब्ध होणार

- नाशिक जिल्ह्यात कांदा लिलाव अद्याप बंदच

- सप्टेंबर महिन्यात जी एस टी संकलनात गेल्या वर्षीच्या तुलनेत १० टक्के वाढ

**आणि**

- आशियाई क्रीडास्पर्धांमधे अडथळ्याच्या शर्यतीत अविनाश साबळेनं नवा विक्रम नोंदवत मिळवलं सुवर्णपदक

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार आज स्वच्छतेसाठी एक तारीख एक तास एक साथ मोहिमेत नागरिकांनी मोठ्या संख्येनं भाग घेतला. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यासाठी आज सकाळी १० वाजता स्वच्छता मोहिमेसाठी एक तास श्रमदान करण्याचं आवाहन मोदी यांनी नागरिकांना केलं होतं. त्यांनी आज स्वतः सहभागी होत या मोहिमेत देशाचं नेतृत्व केलं.

युट्युबर अंकित बैयनपुरीया यांच्यासमवेत प्रधानमंत्र्यांनी स्वतः केरकचरा काढून स्वच्छतेचं महत्त्व पटवून दिलं.

बाजारपेठा, रेल्वे मार्ग, जलाशय, पर्यटन स्थळं, प्रार्थनास्थळं यासह सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता उपक्रमात सर्व स्तरातले नागरिक सहभागी झाले.

राज्यात, नागरिकांच्या श्रमदानाने स्वच्छता मोहीम राबवली गेली. नगरविकास विभागानं या मोहिमेचे आयोजन केलं.

मुंबईत आज गिरगाव चौपाटीवर नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या जोडीनं, राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मान्यवरांनी स्वत: हातात झाडू घेऊन श्रमदान करत मोहीमेचा प्रारंभ केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे आज स्वच्छतेची ही लोकचळवळ झाली आहे, असं यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बातमीदारांशी बोलतांना म्हणाले. राज्यात शहरी आणि ग्रामीण मिळून ७२ हजारापेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छतेची ही मोहीम पार पडली असून, त्याबद्धल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. स्वच्छता हा काही केवळ एक दिवस, आणि कुणीतरी एकानंच राबवण्याचा कार्यक्रम नाही, तर ती नेहमीसाठीची आपली जीवनशैली असली पाहिजे, असं ते म्हणाले....

**होल्ड - बाईट - मुख्य़मंत्री**

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे जुहू चौपाटी इथं स्वच्छता अभियान मोहिमेत सहभागी झाले.

स्वच्छता अभियानांतर्गत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करून बारामती शहरात नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांसह स्वच्छता मोहिमेत भाग घेतला.

या स्वच्छता अभियानाअंतर्गत आकाशवाणी मुंबईच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आकाशवाणीच्या परिसराची स्वच्छता केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आज राज्यातही सर्वत्रच स्वच्छता मोहीम राबवली गेली. केंद्रसरकार आणि राज्यसरकारची कार्यालयं, निमसरकारी आणि बिगरसरकारी संस्था आणि शैक्षणिक संस्था यात सहभागी झाल्या. १० ते ११ या कालावधीत राज्यातल्या सर्व ४११ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधे एकूण १४ हजार ५२२ ठिकाणी नागरिकांच्या सहभागाने श्रमदानातून स्वच्छता करण्यात आली. यात मान्यवरांसह १६ लाख ४ हजार ९९५ नागरिकांनी सहभाग घेत सुमारे १ हजार ९४२ टन कचरा जमा करण्यात आला असल्याची माहिती नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के.एच. गोविंदराज यांनी दिली.

**मुंबईत** कांदिवली परिसरात रेल्वे स्थानक परिवार आणि आकुर्ली मार्गावर स्वच्छता मोहीम राबवली गेली. भाजपचे, कार्यकर्ते, महापालिका कर्मचारी तसंच नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे सदस्य आणि विद्यार्थी या मोहीमेत सहभागी झाले होते.

**जालन्यात** शहरातल्या ३० प्रभागांमध्ये ६० ठिकाणी स्वच्छता अभियानाचं आयोजन केलं गेलं. मोतीतलाव परिसरात झालेल्या अभियानात केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे सहभागी झाले होते.

**अकोल्यात** मध्य आणि दक्षिण मध्य रेल्वे स्थानक परिसरात स्वच्छता मोहिम राबवली गेली. भुसावळ विभागाअंतर्गतच्या १८ रेल्वे स्थानकांवरही रेल्वे कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेसाठी श्रमदान केलं.

**जळगावमध्ये** जन शिक्षण संस्थानाच्या वतीनं बस स्थानक परिसर आणि उपजिल्हा रुग्णालय परिसराची स्वच्छता केली गेली.

**कोल्हापूरमध्ये** शिवाजी विद्यापीठानं राबवलेल्या मोहीमेत दोन टन कचरा गोळा केला गेला.

**धुळ्यात** शहरी भागासह ग्रामीण भागांमध्ये राबवलेल्या स्वच्छता मोहीमांमध्ये नागरिकांना माझी वसुधंराची शपथ घेतली.

सांगलीत मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीनं ४२ ठिकाणी स्वच्छता मोहीमेचं आयोजन केलं गेलं. या मोहीमेत ७० टन पेक्षा जास्त कचरा गोळा केला गेला.

**नाशिकमध्ये** पोलीसांनी श्रमदान करत आयुक्तालयाच्या हद्दीतल्या सर्व पोलीस ठाण्यांच्या परिसराची स्वच्छता केली. जिल्ह्याच्या दिंडोरी तालुक्यात आयोजित मोहीमेत केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार सहभागी झाल्या होत्या.

**अहमदनगरमधल्या** स्वच्छता मोहीमेत सुमारे २०० विद्यार्थ्यांनी मिळून दत्तसागर तलावाची स्वच्छता केली.

**नवी मुंबई, रायगड, नंदुरबार, हिंगोली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग उस्मानाबाद,** इथं झालेल्या स्वच्छता अभियानाच्या बातम्या आमच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

**<><><><><><>**

स्वच्छता ही सेवा अभियान तसंच छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या साडेतीनशेव्या वर्षानिमीत्त राज्यात आज गडकिल्ले स्वच्छता अभियान राबवलं गेलं. मुंबईत शिवडी इथल्या किल्ल्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या अभियानाचा प्रारंभ झाला. गड किल्ले हे आपले

अभिमान आहेत आणि त्यांच्या स्वच्छतेसाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे, जिल्हा वार्षिक योजनेतून दरवर्षी गड किल्ल्यांसाठी तीन टक्के निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी घोषणा फडणवीस यांनी यावेळी केली.

अभियानात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, आणि भाजपाचे अनेक नेते आणि मोठ्या संख्येनं विद्यार्थी सहभागी झाले होते.

उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर जवळच्या नळदुर्ग किल्ला परिसरात सोलापूरचं क्षेत्रीय प्रचार कार्यालय आणि धाराशीवच्या पर्यटन जनजागृती संस्थेनं ही मोहीम राबवली.

<><><><><><>

कांदा प्रश्नी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी केलेल्या मध्यस्थी नंतरही लिलाव बंद ठेवण्याचा निर्धार नाशिक जिल्हा कांदा व्यापारी संघटनेनं व्यक्त केला आहे. पिंपळगाव बसवंत इथं काल झालेल्या नाशिक जिल्हा कांदा व्यापारी संघटनेच्या बैठकीत लिलाव बंद आंदोलन पुढं चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

केंद्र सरकारनं वाढवलेलं ४० टक्के निर्यात शुल्क कमी करावं, नाबार्ड आणि एनसीसीएफ नं खरेदी केलेला कांदा देशांतर्गत बाजारपेठेत विकू नये यासह विविध मागण्यांसाठी कांदा व्यापाऱ्यांनी आंदोलन सुरू केलं आहे. हे आंदोलन मागे घ्यावं यासाठी शासकीय स्तरावर बैठकाही झाल्या आहेत.

<><><><><><>

सप्टेंबर महिन्यात देशातलं जी एस टी अर्थात वस्तू आणि सेवाकर संकलन, एक लाख ६२ हजार ७१२ कोटी रुपये इतकं झालं आहे. हे संकलन गेल्या वर्षीच्या

सप्टेंबर महिन्याच्या संकलनापेक्षा दहा टक्क्यांनी अधिक आहे. २०२३-२४ मध्ये जी एस टी संकलनानं आतापर्यंत चार वेळा एक लाख ६० हजार कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे.

सप्टेंबर महिन्यातल्या महसुलापैकी सीजीएसटी अर्थात केंद्रीय वस्तू आणि सेवा करापोटी २९ हजार ८१८ कोटी रुपये, राज्य जी एस टी ३७ हजार ६५७ कोटी रुपये, एकात्मिक जी एस टी ८३ हजार ६२३ कोटी रुपये आणि उपकर ११ हजार ६१३ कोटी रुपये आहे.

**<><><><><><>**

चीनमधे हँगझोऊ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आज आठव्या दिवशी भारतानं तीन सुवर्णपदकांची कमाई केली.

पुरुषांच्या ३ हजार मीटर अडथळ्याच्या शर्यतीत अविनाश साबळे यानं नवा आशियायी विक्रम नोंदवत सुवर्णपदकावर नाव कोरलं. पुरुषांच्या गोळाफेकीत तेजींदर पाल तूर यानं २० पूर्णांक ३६ मीटर गोळा फेकत सुवर्ण पदकाची कमाई केली. तर महिलांच्या पंधराशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत हरमीलन बैंस हीनं रौप्यपदक पटकावलं.

या स्पर्धेत भारतानं आतापर्यंत, १३ सुवर्ण, १९ रौप्य आणि १८ कांस्य पदकांसह एकूण ५० पदकांची कमाई केली आहे. पदकतालिकेत भारत सध्या चौथ्या स्थानावर आहे.

**<><><><><><>**

सातारा जिल्ह्यातल्या कृष्णा प्रकल्पाच्या फेरजलनियोजनाला राज्य सरकारनं मान्यता दिली असून, त्यासंबंधीची अधिसूचना आज जारी करण्यात

आली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज समाज माध्यमावर ही माहिती दिली.

या प्रकल्पामुळे सातारा जिल्ह्यातल्या दुष्काळप्रवण भागांना कृष्णा प्रकल्पातून २ टीएमसी अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे मुख्यत्त्वे सातारा, कोरेगाव, माण आणि खटाव या तालुक्यात ९००० हेक्टर भागाला सिंचनाचा लाभ मिळेल. या माध्यमातून लक्ष्मणराव इनामदार उपसा सिंचन योजना सुद्धा लाभान्वित होणार आहे, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

पनवेलजवळ मालगाडी घसरल्यामुळे कोकण रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली आहे. आज सुटणाऱ्या अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या असून, २० गाड्या उशिराने धावत आहेत. आज रद्द करण्यात आलेल्या गाड्यांमध्ये चिपळूण-दिवा, पनवेल-खेड, मुंबई मडगाव मांडवी एक्स्प्रेस, मुंबई- सावंतवाडी गणेशोत्सव विशेष, मडगाव-मुंबई कोकणकन्या एक्स्प्रेस, सावंतवाडी-दादर तुतारी एक्स्प्रेस, आणि इतर या गाड्यांचा समावेश आहे.

मुंबई - मडगाव जनशताब्दी एक्स्प्रेस, तसंच नेत्रावती एक्स्प्रेस या गाड्या कल्याण-पुणे-मिरज-लोंढा मार्गे मडगावकडे वळवण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त उद्या मुंबईत इंडिया आघाडीच्या वतीनं पदयात्रा काढली जाणार आहे. या पदयात्रेत 'मी पण गांधी' असा नारा दिला जाणार आहे, असं मुंबई प्रदेश काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं.

या वेळी इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांचे मुंबईतले सर्व प्रमुख नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

व्हाईस ॲडमिरल तरुण सोबती, यांनी नौदल उपप्रमुख म्हणून आज पदभार स्वीकारला. ३० सप्टेंबर २०२३ रोजी सेवानिवृत्त झालेले व्हाईस ॲडमिरल संजय महिंद्रू यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला.

१ जुलै १९८८ पासून भारतीय नौदलाच्या सेवेत असलेले व्हाईस ॲडमिरल तरुण सोबती यांना राष्ट्रपतींच्या हस्ते २०२० मध्ये विशिष्ट सेवा पदक आणि २०२२ मध्ये अतिविशिष्ट सेवापदकानं सन्मानित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात काल रात्रीपासून आज संध्याकाळपर्यंत मुसळधार पावसाची संततधार सुरू आहे. अतिवृष्टीमुळे रत्नागिरी शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी दिवसभर वीजपुरवठा खंडित होता. तो संध्याकाळी पूर्ववत झाला. खेड, संगमेश्वरसह जिल्ह्यात अनेक ठिकाणी सखल भागांत पाणी शिरल्याच्या घटना घडल्या. मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी तालुक्यातल्या निवळीमध्ये दरड कोसळल्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती.

येत्या दोन दिवसात राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाचा शक्यता असून कोकणात यलो अलर्ट तर मध्य महाराष्ट्रात ऑरेंज अलर्ट हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. याकाळात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होईल.

**//<><><><><>//**